I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
## प्रथम खबर अहवाल
## (कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S. (पोलीस ठाणे):** कदीम -जालना **Year (वर्ष):** 2021

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0096 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/03/2021 19:10 वाजता

2.

| S. No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):**

**Date (दिनांक):** 10/03/2021 **Time (वेळ):** 18:30 तास

(b) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 027 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 10/03/2021 18:44 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ज्ञानेश्वर इंद्रकुमार काळे

(b) **Father's/Husband's Name (पिता/पति का नाम):**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख / वर्ष):** 1992 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)(ओळख विवरण (राशन कार्ड, मतदाता कार्ड, पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळख पत्र चा प्रकार) | ID Number (ओळख संख्या) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता): |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रंगनाथनगर, इंदेवाडी, ता जिजा, कदीम -जालना, जालना, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | रंगनाथनगर, इंदेवाडी, ता जिजा, कदीम -जालना, जालना, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल सं.):** 0

6. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|
| 1 | श्री. संुदरराव मुंजाजी वाहुळकर | | 1. Town/Village (शहर / गाव): श्री संुदरराव मुंजाजी वाहुळकर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): कदीम -जालना,District (जिल्हा): जालना,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

7.

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील): | Value(In Rs/-) मूल्य (रू. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली . | 1,000.00 |

8. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मूल्य (रू. मध्ये):** 1,000.00

9. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र., जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

10. **First Information contents (प्रथम खबर मजकूर):**

फिर्यादलाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना दिनांक 10.03.2021.मी ज्ञानेश्वर इंद्रकुमार काळे, वय 29 वर्ष, व्यवसाय शेती, रा.रंगनाथ नगर, ईंदेवाडी, ता.जि.जालना, मुळ रा. मौजे हिवर्डी, पो. हस्ते पिंपळगांव, ता.जि.जालना. मो. नं. 9561886689, 8626080754.समक्ष हजर राहुन फिर्याद देतो कि, मी आज दिनांक 10/03/2021 रोजी मोबाईल फोन व्दारे पोलीस अमंलदार श्री. सचिन राऊत, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांना फोनव्दारे कळविले की, मला जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे एका ऑफिसमध्ये लाचेची मागणी करत आहेत.असे सचिन राऊत यांना कळविल्यावरुन ते मला म्हणाले कि, मी, पोलीस निरीक्षक श्री ताटे साहेब, पंच व स्टाफ असे आपणांस भेटण्यासाठी मोतीबाग जवळील अंबड चौफुलीकडे जाणा-या रोडवर सुरक्षीत ठिकाणी येतो असे कळुन लगेच सदर ठिकाणी पोलीस अमंलदार सचिन राऊत, त्यांचे सोबत श्री संग्राम ताटे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना तसेच तेथील स्टफ व दोन पंच असे आले व त्यांनी माझा परिचय करुन त्यांचा परिचय दिला. त्यानंतर माझी तक्रार त्यांना समक्ष दिली ती, मी वरील ठिकाणी राहणारा असुन शेती व्यवसाय करतो. माझे वडील नामे इंद्रकुमार त्रींबकराव काळे हे ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग घनसावंगी येथे शाखा अभियंता म्हणुन नोकरीस होते. ते दिनांक 31/07/2020 रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. ते सेवानिवृत्त झाल्यांने त्यांचे नोकरीचे काळातील गट विम्याचे (GIS) रक्कम रु.37,281/- चे बिल जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जालना यांनी मंजुर होवुन मिळण्यासाठी कोषागार कार्यालय, जालना येथे पाठविले होते. कोषागार कार्यालयात बिल पाठवुनही ते मंजुर न झाल्यांने व माझे वडील वयस्कर असल्याने सध्या कोरोना संसर्ग रोगाची लागन चालु असल्यांने त्यांना त्याची लागण होवु नये म्हणुन मी त्यांचे वतीने सदर बिल मंजुर का झाले नाही याचा पाठपुरावा करण्यासाठी कोषागार कार्यालयामध्ये दिनांक 05/03/2021 रोजी जावुन माझे वडील नामे इंद्रकुमार काळे यांचे गट विम्याचे (GIS) बिल का मंजुर झाले नाही याची चौकशी केली असता तेथे मला समजले की, गट विम्याच्या टेबलचे काम उपलेखापाल श्री. वाहुळकर यांच्याकडे आहे. मी त्यांचे कामकाजाचे ठिकाणी जाऊन उपलेखापाल श्री.वाहुळकर याचेकडे माझ्या वडील नामे इंद्रकुमार काळे हे ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग घनसावंगी येथुन सेवानिवृत्त झाले असुन त्यांचे अदयाप पर्यत गट विम्याचे (GIS) रक्कम रु. 37,281/- चे काय झाले या बाबत विचारणा केली असता श्री.वाहुळकर यांनी मला सांगीतले की, सदर फाईलमध्ये त्रुटी असुन त्यामध्ये कार्यालयीन आदेश व गट विम्याचा एक हप्ता कमी भरलेला आहे. सदरची फाईल त्रुटी पुर्ततेसाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना यांचेकडे परत करावी लागेल. तेव्हा मी म्हणालो साहेब या अगोदर सुध्दा तुम्ही माझ्या वडीलाच्या गट विम्याची (GIS) रक्कम मागणीची फाईल त्रुटीपुर्ततेसाठी परत त्याचे कार्यालयात पाठविली होती. तेव्हा श्री. वाहुळकर मला म्हणाले की, तुझ्या वडीलाची गट विम्याची (GIS) रक्कम वडीलांच्या बक खात्यात जमा करावयाची असल्यास तुला मला 1000/- रु. दयावे लागतील. तेव्हा माझ्या जवळ पैसे नसल्यांने मी नंतर आणुन देतो असे सांगीतले व कोषागार कार्यालयातुन गावाकडे निघुन गेलो. माझी कोषागार कार्यालयातील उपलेखापाल श्री. वाहुळकर यांना लाच द्यायची इच्छा नाही परंतु लाच दिली नाही तर ते माझे वडीलाचे गट विम्याचे रक्कम (GIS) रु. 37,281/- रु. बकेत जमा करणार नाहीत. श्री.वाहुळकर साहेब यांचेशी माझी वैयक्तीक दुश्मणी नाही, अगर देण्याघेण्याचा अथवा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही. श्री. वाहुळकर साहेब हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहित आहे. मी श्री वाहुळकर, उपलेखापाल, कोषागार कार्यालय, जालना यांना भेटण्यासाठी त्यांचे कोषागार कार्यालयात जाणार असुन त्यावेळी मी त्यांना माझे वडीलाचे गट विम्याचे रक्कम रु. 37,281/- रु. माझे वडीलांचे खात्यावर जमा करणे बाबत विनंती करणार आहे. त्यावेळी श्री.वाहुळकर साहेब यांनी मला लाचेची मागणी करुन ते स्वत: किंवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांना पकडून कार्यवाही करावी.अशा मजकुरांची तक्रार दिली.त्यावरुन ला.प्र.वि.जालना येथील पोलीस निरीक्षक श्री.ताटे यांनी दिनांक 10.03.2021 रोजी माझी तक्रार लेखी व टंकलीखीत करुन पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना सांगीतली. माझ्या तक्रारीवरुन मी श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांचे विरुध्द केलेली तक्रार खरी आहे काय व श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल हे माझ्याकडे लाच मागतात काय, याची खात्री करण्यासाठी लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी मला व पंच 1. श्री. रवि हरीभाऊ पवार यांना जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांना भेटण्यासाठी पाठविण्यात आले. त्यावेळी माझ्याकडे व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन देण्यात आले होते. त्यावेळीचे भेटीमध्ये मी माझे वडीलांचे गट विम्याची रक्कम त्यांचे खात्यावर जमा करण्यासाठी श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांना भेटलो असता श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांनी माझ्याकडे तुमच्या वडीलांचे गट विम्याची रक्कम 37,281/- रुपये वडीलांचे खात्यावर जमा करण्यासाठी मला 1,000/- रुपये दयावे लागतील अशी लाचेची मागणी करुन लाच स्वीकारणार असल्याचे निष्पन्न झाले. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्यानंतर दि.10.03.2021 रोजी मी, श्री ताटे साहेब व ला.प्र.वि.जालना येथील स्टफ व नमुद पंच यांचे समक्ष मोतीबाग येथील अबंड चौफुलीकडे जाणा-या रोडवरुन मी श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांना माझ्या मोबाईलवरुन फोन केला असता त्यांनी मोबाईल फोनवर मला सांगीतले की,अंबड चौफुलीजवळ तुम्हाला भेटतो असे कळविल्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब यांनी श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांचे विरुध्द अंबड चौफुली जवळ, जालना येथे सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर अंबड चौफुली ते मोतीबाग रोडवर रस्त्याचे कडेला सुरक्षित ठिकाणी खाजगी वाहनामध्ये अंथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हाईलेट लम्प यांची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांना लाच म्हणुन

देण्यासाठी माझ्याकडील पैशातुन 1,000/- रु वेगळे काढले व त्याला अंथ्रासीन पावडर लावली. श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांना देण्यासाठी थ्रसीन पावडर लावलेले पैसे माझ्या शर्टाच्या डाव्या खिशात ठेवले. सापळा पथकातील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या. त्यानंतर मला पोलीस निरीक्षक श्री ताटे साहेब यांनी सुचना दिली की, श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांनी लाच स्वीकारल्यानंतर तुम्ही तुमच्या डोळयावरचा चष्मा काढुन गोल फिरवाचा असे सांगीतले.याबाबतचा पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला. मला व पंच नं 1. श्री. रवि हरीभाऊ पवार यांना श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांना भेटण्यासाठी व्हाइस रेकर्ड सुरु करुन अंबड चौफुली जवळ, जालना येथे पाठविले. त्यानंतर मी व पंच 1. श्री. रवि हरीभाऊ पवार असे माझ्या मोटार सायकलने अंबड चौफुलीकडे कडे निघालो, आमच्या मागेच पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब व सर्व स्टफ तसेच पंच नं 2 श्री. संतोष मधुकर वाढे असे आले व श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांचे विरुध्द लक्की ज्युस सेंटर, नुतन वसाहत रोडवरील, अंबड चौफुली जवळ जालना येथे सापळा लावण्यात आला. सर्व जण एकमेकांना दिसतील, अशा प्रकारे थांबले. तेव्हा मी लक्की ज्युस सेंटरजवळ थांबलो असता श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल हे आले आणि आम्ही बोलत बोलत लक्की ज्युस सेंटरमध्ये गेलो. आमच्या पाठीमागे पंच क्रमांक 1. श्री. रवि हरीभाऊ पवार असे येवुन लक्की ज्युस सेंटरमध्ये येवुन बसलो. सापळा पथकातील पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब व स्टफ असे तेथे आलेे असतांना लक्की ज्युस सेंटरमध्ये श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांनी माझ्याकडुन दुपारी 01.30 वा. सुमारास माझ्या वडीलांचे सेवानिवृत्तीनंतरचे गट विमा (GIS) रक्कम 37,281/- रुपये त्यांचे खात्यावर जमा करण्यासाठी माझेकडुन 1,000/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारली. त्यांनी माझ्याकडुन स्वीकारलेली लाचेची रक्कम 1,000/- रुपये घेवुन त्यांचे शर्टच्या वरील खिशामध्ये ठेवली. त्यावेळी पंच 1. श्री. रवि हरीभाऊ पवार हे समक्ष हजर होते. त्यानंतर मी सापळा पथकास आधी ठरल्या प्रमाणे माझ्या डोळयावरील चष्मा काढुन गोल फिरवला, तेव्हा पोलीस निरीक्षक श्री.ताटे साहेब व स्टफ तसेच पंच नं.2 श्री. संतोष मधुकर वाढे असे लगेच पाठीमागुन त्याठिकाणी येवुन श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांना ताबडतोब पकडले. पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब यांनी श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांना त्यांची स्वत:ची व सर्वाची ओळख करुन दिली. श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. संुदरराव मुंजाजी वाहुळकर, वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी, उप लेखापाल जिल्हा कोषागार कार्यालय, जालना रा. समर्थ एसटीडीजवळ, जमुनानगर जालना. मुळ रा. कोडी कारला ता.जि. जालना असे सांगीतले. तेव्हा त्यांनी स्वीकारलेली लाचेची रक्कम 1,000/- रुपये पंच क्र 2 श्री. संतोष मधुकर गाढे यांना ताब्यात घेण्यास सागिंतले. मला पोलीस निरीक्षक श्री.ताटे साहेब यांनी खाजगी गाडी जवळ बोलावुन त्याठिकाणी माझे जवळील व्हाईस रेकर्डर कर्मचारी श्री. सचीन राऊत यांनी बंद केला व माझे हात पंचासमक्ष तपासण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब, स्टाफ, दोन्ही पंच, मी व श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांना सोबत घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे आलो. सर्व घटने बाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.तरी दिनांक 10.03.2021 रोजी दुपारी 01.30 वा. दरम्यान लक्की ज्युस सेंटर, नुतन वसाहत रोडवरील, अंबड चौफुली जवळ जालना येथे श्री. सुंदरराव वाहुळकर, उपलेखापाल यांनी माझ्या वडीलांचे सेवानिवृत्तीनंतरचे गट विमा (GIS) रक्कम 37,281/- रुपये त्यांचे खात्यावर जमा करण्यासाठी पंच 1 श्री. रवि हरीभाऊ पवार यांचे समक्ष 1,000/- रुपयेची लाच स्विकारली, तेव्हा त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती.ज्ञानेश्वर इंद्रकुमार काळे